(पोपट वि. संदिप)

**वादीतर्फे सा.क्र.१**

**उलटतपास प्रतिवादी क्र. १५ व १६ तर्फे विधीज्ञ श्री. बी. एल. ढोकणे यांच्यामार्फत-**

१. वादग्रस्त मिळकतीचा गट क्र. २६९/४/1 आहे. वादग्रस्त मिळकतीच्या पुर्वेला-माझी जमीन, पश्चिमेला-प्रतिवादी क्र. १२ ते १६ यांची जमीन, दक्षिणेला-माझी जमीन व उत्तरेला-प्रतिवादी क्र. १२ ते १६ यांची जमीन आहे. साक्षीदार पुन्हा सांगतो की, पुर्वेला चारी आहे. पश्चिमेला शिव रस्ता आहे. साक्षीदार पुन्हा सांगतो की, दक्षिण बाजुला चारी आहे. मला प्रतिवादी क्र. १२ ते १६ यांच्या जमिनीचा गट नंबर सांगता येणार नाही. मला प्रतिवादी क्र. १५ याच्या जमिनीच्या चतु:सिमा सांगता येणार नाही. प्रतिवादी क्र. १६ दत्तात्रय याच्या जमिनीच्या पुर्वेला त्यांचीच जमीन आहे. मला प्रतिवादी क्र. १६ याच्या जमिनीच्या चतु:सिमा सांगता येणार नाही. प्रतिवादी क्र. १५ व १६ यांनी त्यांच्या मिळकती कधी विकत घेतल्या हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १५ व १६ यांच्या मिळकती वादग्रस्त मिळकतीच्या शेजारी नाही. माझी मिळकत ही गट क्र. २६९ चा भाग आहे. गट क्र. २६९ मध्ये एकुण १६ वाटण्या आहेत. मला सदर १६ भागांचे गट नंबर सांगता येणार नाही.

२. मी प्रस्तुतचा दावा फाळणी मोजणीसाठी केलेला आहे. मी प्रस्तुत दावा दाखल करण्यापुर्वी जिल्हाधिकारी यांच्याकडे वादग्रस्त मिळकतीची फाळणी मोजणीकरिता अर्ज केला होता. प्रस्तुत प्रकरणात सन २०१६ साली मोजणी झाली. प्रस्तुत दाव्यातील मोजणीसाठी दोन इसम आले होते. मोजणीदार सकाळी ११ ते ११.३० वा. आले व अंदाजे ४ ते ५ वाजेपर्यंत मोजणी चालली. प्रतिवादी क्र. १५ यांची ४० आर जमीन व प्रतिवादी क्र. १६ यांची २० आर जमीन आहे. माझ्या जमिनीत झाडे आहेत. माझ्या मिळकतीच्या उत्तर बाजुस रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर रस्त्याच्या कडेला झाडे आहेत. प्रतिवादी क्र. १५ व १६ यांनी १५-१६ गुंठे माझ्या जमिनीवर अतिक्रमण केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १५ व १६ हे

(पोपट वि. संदिप)

माझ्या शेजारी नाही व त्यांनी माझा कुठलाही बांध फोडला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १५ व १६ यांनी माझ्या मिळकतीवर अतिक्रमण केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १५ व १६ यांना त्रास देण्यासाठी खोटा दावा दाखल केला.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही. श्रवणोत्तर स्विकृत

MAYUR EKNATHRAO PAWAR

Digitally signed by MAYUR EKNATHRAO PAWAR
Date: 2026.03.09 16:41:54 +0530

(मयुर ए. पवार)

दिनांक:-०९/०३/२०२६. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,

ता. राहुरी, जि. अहमदनगर.